१	Indoor Beds	Human Anatomical Waste, Microbiology Waste, Waste Sharp, Discarded Medicine & Cytotoxic Drug, Solid Waste, Syringes, Glass Bottles, Plastic Bottles, IV Bottles. (१०.४५ Rs./day/bed x ६० Beds x ३० Day)	१८८१०
२	OPD	Needles, Syringes, Blades, Scalpels, Glass, Discarded Medicine & Cytotoxic Drugs, Cotton Dressing Human Anatomical Waste, Microbiology Waste, Liquid Waste, Waste Generated During Post-mortem	१८८४
३	OT Rooms & Labour Rooms		१८८४
४	Pathology		१८८४
५	Transportation	CBWTF Pall to Government Medical College and Hospital, Dharashiv Distance ११८ km. (१७ Rs/km x११८km x ३० days)	१५३०
		Amount	२५९९२
		CGST ६ %	१५५९.५२
		SGST ६ %	१५५९.५२
	Total Amount (In word Rs. Twenty Nine thousand one hundred and eleven only)		२९१११

वरील तक्यात नमुद मान्य केलेल्या दराप्रमाणे सन २०२४-२५ या वर्षासाठी दि.३१.१२.२०२४ ते दि.३१.१२.२०२७ या कालावधीसाठी जिल्हा अथवा संदर्भ क्रमांक ३ मधील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे आदेशानुसार या महाविदयालय व रुग्णालय अंतर्गत कार्यरत असलेल्या जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालयातील जैव वैदयकीय घनकचरा वाहतुक व विल्हावाट लावण्यास व या संदर्भात वरीष्ठा स्तरावरुन भविष्यात जो निर्णय घेतला जाईल, त्याच्या आधीन राहुन व खालील अटी शर्तीच्या अधीन राहुन या आदेशान्वये मंजुरी देण्यात येउन परवानगी देण्यात येत आहे.

१. या महाविद्यालय व रुग्णालयातील व अधिनस्त रुग्णालयातील, तसेच कोविड- १९ प्रादुर्भावाच्या अनुषंगाने समर्पित रुग्णालय सी.सी.सी. व कोविड लॅब येथील जैव वैद्यकीय घनकचरा ४८ तासांच्या आंत उचलुन घेउन जाणे आपणांस बंधनकारक राहील.

२. बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट रुल्स १९९८ मधील अटी व शर्तींचे तंतोतंत पालन केले जाईल, याची सदर संस्थेने दक्षता घ्यावी.

३. पत्रात नमुद केलेले दर हे दि.३१.१२.२०२४ ते दि.३१.१२.२०२७ या कालावधीसाठी अथवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या पुढील आदेशाच्या आधीन राहून बंधनकारक राहतील. कोणत्याही कारणास्तव झालेली वाढ सदर कालावधीतली ग्राहय धरली जाणार नाही.

४. सुरक्षा ठेव म्हणुन रक्कम रु. ३०,०००/- (अक्षरी रुपये तीस हजार फक्त) डिमांड ड्राप्ट किंवा आपल्या संस्थेचा करंट अकांउंटचा चेक या कार्यालयास जमा करावा लागेल.

५. आपली रुग्णालयीन जैव वैदयकीय घन कचरा व विल्हेवाट लावण्याची पध्दत ही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अनुषंगाने न आढळल्यास ती सेवा कोणत्याही क्षणी रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

६. करारानामा रु.१००/- च्या बॉन्डवर वेगळा भरुन घ्यावा लागेल.

७. वरील दि.३१.१२.२०२४ ते दि.३१.१२.२०२७ हा कालावधी संपुष्टात येताच पुढील आदेशाबाबतची प्रमाणपत्राची व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता आपल्यास्तरावरुन त्वरित करुन घ्यावी . अन्यथा या रुग्णालयातील सेवा बंद करणेबाबात आपणांस वेगळे पत्र अथवा आदेश या कार्यालयामार्फत निर्गमित करण्यात येणार नाही.

८. शासनाकडुन निधी उपलब्ध होताच, आपली देयके अदा करण्यात येतील. आपली देयके तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावी.

(डॉ.शैलेंद्र द. चौहान)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय, धाराशिव

प्रत :-

१. वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव/स्त्री रुग्णालय यांना सुचित करण्यात येते की, सादर करण्यात आलेली देयके तपासुन प्रमाणित करुन देण्यात यावीत.

२. मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना देवुन विनंती करण्यात येते की, अत्यावश्यक सेवा व रुग्णसेवा लक्षात घेता तसेच हे महाविद्यालय नवनिर्मित असल्यामुळे वरील आदेशास मंजुरी देण्यात यावी.

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमधा/स्वी.स/ 6391 /२०२३ दि.: ७/११/२०२३

प्रति,
मा.संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

विषय- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा सामान्य रुग्णालय,स्त्री रुग्णालय आणि क्षय रुग्णालय यांच्यासमवेतचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव या संस्थेशी करण्यात आलेला सुधारीत मसुदा स्वाक्षरीकरीता सादर करणेबाबत.

संदर्भ - १.या कार्यालयाचे पत्र क्र.शावैमउ/३३१७-२५/२३ दि.०२/०५/२०२३
२. शासन पत्र क्रमांक. एमईडी- २०१९ प्र.क्र. १८४(भाग-अ)/१९ शिक्षण-१, दि.१३/०६/२०२३
३. DMER-१२०११/१३/२०२२ EDU. दि.३०/०६/२०२३

मा.महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार आपण आदेशीत केल्यानुसार तत्कालीन परिस्थित नव निर्मीत शासकीय महाविद्यालय सुरु झाले तेव्हा दिनांक २०/०५/२०२२ च्या सांमजस्य करारानुसार जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालय,धाराशिव महाविद्यालयाकडे हस्तांतरीत झाले होते. रुग्णालयीन सेवा व विद्यार्थीहित लक्षात घेता जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालयाचे मनुष्यबळ पुढील काही वर्ष महाविद्यालयाकडेच असावे अशी धारणा असल्याकारणाने या कार्यालयाकडून सांमजस्य करारामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे विनंतीवजापत्र आपल्या कार्यालयास सादर करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव आणि जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालय,धारशिव यांच्यासोबत आपल्या वरिल संदर्भीय आदेशानुसार सांमजस्य करारातील अट क्र. ५ व २२ मध्ये अंशत: बदल करुन सदरचा सांमजस्य करार आपल्या अवलोकनार्थ व पुढील मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

डॉ. शिल्पा व. दोमकुंडवार,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

प्रत-मा.सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई यांना संदर्भ क्र.२ च्या अनुषंगाने सविनय सादर

8/12/23
लिपिक, नोंदणी शाखा
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

8/12/23
आवक जावक लिपिक
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई

Dean,
Government Medical College
Dharashiv

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ 72AA 215688

धाराशिव ता.क्र. 26286 दिनांक 30/11/2023

श्री मा. अधीक्षक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव.

हस्ते रेणुका शेटे

यांना जनरल स्टॅम्प रु. 100/- भागितलेवरुन

हा स्टॅम्प रु. 100/- चा व पावतीस रु.

चा स्टॅम्प दिला.

कारण. करार नामा

श्रीनिवास बागड
मुद्रांक विक्रेता धाराशिव
प.क्र.३५०१०१८

DISTRICT TREASURY
OFFICE DHARASHIV
22 NOV 2023
Stamp Head Clerk / S.T.O.
DHARASHIV

अटी व शर्ती

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत पूर्ण होण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागाने आवश्यक ते नियोजन व निधीची तरतूद केली आहे. सदरच्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन प्रत्यक्षात बांधकाम सुरू होण्यास काही अवधी लागणार आहे. याकरिता राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोगाची मान्यता मिळण्यास अडचण येऊ नये म्हणून रुग्णालयाच्या इमारतींचा वापर वैद्यकीय महाविद्यालयाच्या मान्यता करिता करता येईल.

२. राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोगाची मान्यता प्राप्त करण्याच्या दृष्टीने जिल्हा शल्यचिकित्सक पूर्ण सहकार्य करतील.

३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक हे रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक म्हणून कामकाज पाहतील.

NOTARY
GOVT OF INDIA
Adv SURESH U.MULE
Dist.Osmanabad(Maha.)
Cell No 9881089078

11 DEC 2023



[illegible] कामासाठी सादर करावयाचे
[illegible] Affidavit
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व रहिवाशी पत्ता
Stamp Purchaser's Name/Place of Residence
मुद्रांक विक्री [illegible] नोंद वही अनुक्रमांक/दिनांक
Serial No./Date
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही
Stamps Purchaser's Sign/Date
दिनांक
परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याची सही
परवाना क्रमांक तसेच मुद्रांक विक्री करणाऱ्याचा पत्ता
3501018 धाराशिव

करार नामा

मा. अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महा. -विद्यालय धाराशिव.

20286 | 30/11/2023

४. जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी, आपतकालीन वैद्यकीय अधिकारी/ निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत राहतील.

५. आरोग्य सेवेतील इतर तज्ञ वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी वर्ग हे रुग्णालय हस्तांतरित झाल्यापासून फक्त एका वर्षासाठी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत राहतील. त्यानंतर वैद्यकीय शिक्षण विभाग वरील सर्व पदांसाठी पदनिर्मिती करेल, सदर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी अधिष्ठाता आणि रुग्णालय अधीक्षक/ वैद्यकीय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली कार्य करतील. कोणत्याही परिस्थितीत हे अधिकारी/ कर्मचारी प्रतिनियुक्तीने/ समावेशन इतर कोणत्याही पद्धतीने वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागाकडे हस्तांतरित करता येणार नाही. जर वैद्यकीय शिक्षण विभागास आपत्कालीन वैद्यकीय अधीक्षक (सी.एम.ओ) आवश्यक असतील तर तसा प्रस्ताव त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागात कडे देऊन मंजुरी घ्यावी.

तथापी दिनांक २०/०५/२०२२ रोजी झालेल्या सामंजस्य करारानुसार एक वर्षाची अटबाबत करार करण्यात आला होता. सदरचा कालावधी दिनांक १९/०५/२०२३ रोजी संपत असून मा. शासनाने दिनांक १३/०६/२०२३ च्या आदेशानुसार व मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या दिनांक ३०-०६-२०२३ च्या आदेशानुसार यापूर्वीचा सामंजस्य करारा मधील अट शिथिल करून दिनांक १९/०५/२०२३ पासून पुढे दोन वर्षासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग विभागाने सहमती दर्शवली असल्याने दिनांक १९/०५/२०२३ ते दिनांक १८/०५/२०२५ पर्यंत सदर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी अधिष्ठता आणि रुग्णालय अधीक्षक वैद्यकीय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली काम करतील. असा अंशत: बदल मा.शासनाच्या व मा.संचालनालयाच्या आदेशानुसार करण्यात येऊन सदरचा सुधारीत सांमजस्य करार (MOU) करण्यात आला आहे.

६. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध शासकीय योजनेअंतर्गत कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांची सर्व पदे पूर्वीप्रमाणे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे नियंत्रणा खाली राहतील. रुग्णालय हस्तांतर झाल्यानंतर त्यांच्या सेवा आपोआप सार्वजनिक आरोग्यसेवा यंत्रणेकडे वर्ग होतील.

७.जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील सर्व पदे पूर्वीप्रमाणेच जिल्हास्तरावर कार्यरत राहतील. त्यांची वेतन तेथे जिल्हा शल्य चिकित्सक अदा करतील. सार्वजनिक आरोग्य विभागातील इतर सर्व कार्यरत अधिकारी/ कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व देयके पूर्वीप्रमाणे जिल्हा शल्य चिकित्सक अदा करतील. मात्र वैद्यकीय महाविद्यालयातील कार्यरत सर्व अधिकारी/ कर्मचारी अधिष्ठता यांचे नियंत्रणाखा नियंत्रणाखाली राहतील.

८. सदरहू रुग्णालयातील उपलब्ध यंत्रसामुग्री व जड वस्तुसंग्रह आहे त्या स्थितीत वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांना वर्ग करण्यात येईल. यापुढे त्यावरील दुरुस्ती व देखभालीचा खर्च संबंधित वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांनी त्यांचे निधीतून भागवावा .या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाकडे निधीची मागणी मागणी करता येणार नाही. तसेच वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास जी यंत्रसामुग्री व जड वस्तू संग्रह वर्ग करण्यात आला आहे तो सांमजस्य करार संपुष्टात आल्यानंतर सुस्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागास परत करण्यात यावा.

NOTARY
GOVT OF INDIA
Adv SURESH U MULE
Dist. Osmanabad (Maha)

11 DEC 2023

९. जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय /प्राथमिक आरोग्य केंद्र कडून संदर्भित केलेल्या रुग्णांना प्राधान्याने दाखल करून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. यासाठी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक (वैद्यकीय अधीक्षक) हे समन्वय करून ग्रामीण भागातील संदर्भित झालेले रुग्ण दाखल दाखल होतील याची दक्षता घेतील.

१०. राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे सुरू असलेले कार्यक्रम विनाखंड व प्रभावीपणे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत राबविण्यात येतील तसेच, त्यासाठी उपलब्ध निधी खर्च करून राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाकडे वेळेवर अहवाल सादर करण्यात येईल.

११. SNCU/DEIC/Dialsys यांचे कार्यान्वयन, वैद्यकीय महाविद्यालयाने केंद्र शासनाच्या आणि वेळोवेळी येणा-या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करणे आवश्यक राहील. सदर केंद्रातील कंत्राटी कर्मचारी/तज्ञ/ अधिकारी यांच्या सेवा वैद्यकीय महाविद्यालयात इतरत्र वापरता वापरता येणार नाही. या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन जिल्हा शल्यचिकीत्सक अदा करतील. SNCU/DEIC/Dialsys या युनिट दैनदिन कार्यान्वयन संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखाच्या (Unit Head) नियंत्रणाखाली चालेल कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांच्या व्यतिरिक्त त्या विभागासाठी आवश्यक तो कर्मचारी आणि अधिकारी वर्ग उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अधिष्ठाता, वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागाची राहील.

१२.फिरते नेत्र पथक हे पूर्वीप्रमाणेच जिल्हा शल्यचिकित्सक,धाराशिव यांच्या अखत्यारित राहिल, त्यांचे हस्तांतरण करण्यात येऊ नये. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकाप्रमाणे स्वतंत्र नेत्रचिकित्सा शास्त्र विभाग अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या नियंत्रणाखाली राहील जिल्हा शल्यचिकीत्सक, धाराशिव यांच्याकडे नेत्र विभाग , फिरते नेत्र पथक करण्यात आणि अधिष्ठाता त्यांच्या नियंत्रणा खालील नेत्र शल्यचिकीत्सा शास्त्र विभाग व राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम हे समन्वयाने काम पाहतील. एनडीसी आणि वृद्धत्व रुग्णालय तसेच मानसिक आरोग्य कार्यक्रम यांचे मासिक अहवाल जिल्हा शल्यचिकित्सक सादर करतील.(फिरते मित्र पथक कार्यान्वित असल्यास)

१३. शारासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव करिता अधिष्ठाता हे नियंत्रक व प्रशासकीय प्रमुख म्हणून रुग्णालय हस्तांतरणाच्या दिनांका पासून काम पाहतील.

१४. जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरातील सर्व जागा रुग्णालयीन जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्या नावावर राहील. रुग्णालय इमारतीचा वापर वैद्यकीय शिक्षण विभाग करेल तथापि क्षयरोग/ कुष्ठरोग कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, नर्सिंग/ स्कूल कॉलेज इमारत जिल्हा शल्य चिकित्सक औषध भांडार पूर्वीप्रमाणेच जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्या नावे राहील. जिल्हा अंध्यत्व व निवारण सोसायटीसाठी उपलब्ध असलेल्या शस्त्रक्रियापैकी एक शस्त्रक्रिया गृह (OT) मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी उपलब्ध करून द्यावे.

१५. रुग्णालय इमारतीमधील (आधीपासून अस्तित्वात नसलेली बांधकाम न केलेली, इमारत बांधकाम प्रस्तावित असेल इत्यादी वा तत्सम कारणास्तव वेगळी काढणे आवश्यक असेल तर अथवा जिल्हा शल्यचिकीत्सक यांना तशी जागा बांधकाम वगैरे कार्यासाठी आवश्यक असेल तर) सुमारे ५००० हजार चौरस फूट जागा जिल्हा शल्यचिकीत्सक कार्यालय, रुग्णालयीन प्रशासकीय कार्यालय इत्यादीसाठी व सुमारे ५००० हजार चौरस फूट जागा औषधी भांडार यासाठी व अशा कामासाठी एकूण सुमारे १०००० चौरस फुट जागेचे क्षेत्र सार्वजनिक आरोग्य विभाग कडेच ठेवण्यात येईल. या दोन्ही कारणाकरता जिल्हा शल्यचिकित्सक हे त्यांच्या सोयीनुसार व पसंतीने जागा निवडू शकतील.

अ . जिल्हा सर्वोपचार रुग्णालय, धाराशिव परिसरातील रुग्णालयाशी थेट संबंधित नसलेल्या इमारती, आस्थापना इत्यादी पूर्वीप्रमाणेच संबंधित विभागाच्या अधिनस्त राहतील राहील.

१६. जिल्हा शल्यचिकीत्साकांच्या कार्यालयातील आहारण व संवितरण अधिकारी यांची सद्यस्थितीतील पदस्थापना सार्वजनिक आरोग्य विभागांमध्येच जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अखत्यारितच अबाधित सुरू राहील.

अ. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव या संस्थेसाठी वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागाने, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या विद्यमाने नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव या संस्थांसाठी स्वतंत्र आहरण व संवितरण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी.

ब. जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी हा जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अखत्यारितच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम करेल आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव व

NOTARY GOVT OF INDIA SURESH U. MULE

DIAGNOSTICS LTD KRISHNA Chinchwad Pune-19

DIRECTOR OF HEALTH SERVICES, MAHARASHTRA STATE, MUMBAI

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव संस्थांसाठी नियुक्त/प्रतिनियुक्त करण्यात आलेले स्वतंत्र आहारण व संवितरण अधिकारी हे अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांच्या अखत्यारीत काम करतील.

१७. धाराशिव येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करून कार्यान्वित करण्याकरिता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून नव्याने विहित लेखाशीर्ष तयार करून देणे व सदर लेखा शिष्रांतर्गत निधी उपलब्ध होईपर्यंत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून धाराशिव येथील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने रुग्णालया दोन्ही संस्थांना स्वतंत्ररित्या वेगळा निधी उपलब्ध करून द्यावा.

१८. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग महाराष्ट्र शासन यांनी प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे महाविद्यालय व रुग्णालय या दोन्ही आस्थापनावर अध्यापन सेवा व रुग्णसेवा आणि तदअनुंषगीक बाबी समाधानकारकपणे पूर्ण होण्याच्या दृष्टीने विविध विषयातील विशेषज्ञ व वैद्यकीय आस्थापनाचा पुरेसा अनुभव असलेले वैद्यक तज्ञ यांचा सेवा आवश्यकतेनुसार त्यांच्या अख्यारितीतील वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यक तज्ञ यांना या महाविद्यालयात प्रतिनियुक्त करून अथवा त्यांच्या स्तरावर आवश्यक त्या विविध पद्धतीने कार्यवाही करून पदभरतीची कार्यवाही संपन्न करावी व नियोजित नवीन वैद्यकीय महाविद्यालयात विविक्षीत कामे व कार्यप्रणाली सुरळीत राहण्यासाठी आवश्यक पदे उपलब्ध करून द्यावीत. पदे भरेपर्यंत (नियमित, कंत्राटी, बाह्य स्रोत अथवा वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन यांना सुयोग्य वाटेल अशा पद्धतीने भरून) (जे आधी घडेल तोपर्यंत) वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाकडे कार्यरत राहतील.

१९. सार्वजनिक आरोग्य विभागाने विविध शासकीय योजना अंतर्गत कंत्राटी अथवा इतर तत्सम तत्वावर नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांची सर्व पदे आर्थिक बाबींची सार्वजनिक आरोग्य विभागाकडून पूर्तता होणे जमेस धरून पूर्वीप्रमाणे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अखत्यारीतीत राहतील.

२०. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषांची पूर्तता करण्याकरिता रुग्णालयाच्या मूळ रचनेत बदल करण्याकरिता जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या परवानगीची आवश्यकता राहील. अधिष्ठता यांना त्यात काही बदल करावयाचे झाल्यास शासनाची मान्यताप्राप्त करून ते आवश्यकतेनुसार करून घेण्याचा अधिकार राहील.

२१. जिल्हा शल्य चिकित्सक, धाराशिव यांच्याकडे जिल्हा सामान्य रुग्णालय, धाराशिव येथे कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी हे त्यांच्या आर्हते नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निरीक्षणावेळी ट्विटर, कनिष्ठ निवासी, वरिष्ठ व सहाय्यक प्राध्यापक कामकाज पाहतील.

२२. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथील नियमित पदभरती होईपर्यंत सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी, अधिसेविका अधिपरिचारिका, परिसेविका व इतर तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी त्यांना पूर्वी नेमणूक नेमून दिल्याप्रमाणे त्यांचे कार्यरत पदावर नियमितपणे कामकाज पाहतील. सदर कालावधीची मर्यादा कमाल एक वर्षाची राहील त्यानंतर सदर कर्मचाऱ्यांना इतर आरोग्य संस्थेत स्थलांतरित करण्यात येईल.

तथापी दिनांक २०/०५/२०२२ रोजी झालेल्या सामंजस्य करारानुसार एक वर्षाची अटबाबत करार करण्यात आला होता. सदरचा कालावधी दिनांक १९/०५/२०२३ रोजी संपत असून मा. शासनाने दिनांक १३/०६/२०२३ च्या आदेशानुसार व मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या दिनांक ३०-०६-२०२३ च्या आदेशानुसार यापूर्वीचा सामंजस्य करारा मधील अट शिथिल करून दिनांक १९/०५/२०२३ पासून पुढे दोन वर्षासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग विभागाने सहमती दर्शवली असल्याने दिनांक १९/०५/२०२३ ते दिनांक १८/०५/२०२५ पर्यंत सदर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी अधिष्ठता आणि रुग्णालय अधीक्षक वैद्यकीय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली काम करतील. असा अंशत: बदल मा.शासनाच्या व मा.संचालनालयाच्या आदेशानुसार करण्यात येऊन सदरचा सुधारीत सांमजस्य करार (MOU) करण्यात आला आहे.

२३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव या संस्थेकरीता मंजूर झालेल्या पदांना वेतनासाठी नियमितपणे अनुदान प्राप्त होईपर्यंत सद्यस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव या

NOTARY
GOVT OF INDIA
A/F SURESH U MULE
Dist Osmanabad(Maha.)
Cell No 9881089078
11 DEC 2023

संस्थेकरिता जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडील कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन जिल्हा शल्यचिकीतक,धाराशिव हे अदा करतील. सदर व्यवस्था हस्तांतरनापासून सहा महिन्यासाठी कार्यरत राहील.

२४. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव या संस्थे करिता वापरण्यात येणारी यंत्रसामग्री, साधन सामग्री व उपकरणे तसेच शासकीय कामकाजाकरिता आवश्यक ती दूरध्वनी, वीज,पाणी, भाडेपट्टी कर यंत्र सामुग्री देखभाल व दुरुस्ती खर्च व तत्संबधीचे इतर देयके ही नियमित अनुदान प्राप्त होईपर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक, धाराशिव हे अदा करतील. सदर व्यवस्था हस्तांतरापासून सहा महिन्यासाठी कार्यरत राहील.

२५. वैद्यकीय महाविद्यालया करिता स्वतंत्र स्वीय प्रपंच खाते निर्माण करण्याची कार्यवाही अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांचे मार्फत करण्यात येईल.

२६. सर्व कायदेशीर बाबीसाठी उदाहरणार्थ Pre-Conception and Pre-Natal,Diagnostic Technique (PCPNDT), Medical Negligence, Epidemic act व इतर तत्सम समित्यांसाठी जिल्हा समुचित प्राधिकारी हे जिल्हा शल्यचिकीत्सक राहतील.

२७. दिव्यांग तपासणी मंडळ, गट-अ आणि गट-ब अधिकाऱ्यासाठींची वैद्यकीय मंडळे, अधिष्ठता यांच्याकडे निर्माण करण्यात येते. यासाठी स्वालंबन प्रणालीचे नवीन लॉगिन आणि पासवर्ड मिळेपर्यंत दिव्यांग मंडळ जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे नियंत्रणाखाली राहील. गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्रे पूर्वीप्रमाणे जिल्हा शल्यचिकीत्सक देतील. यासाठी तज्ञांचा अभिप्राय आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञामार्फत उपलब्ध करून देण्यात येतील.

२८. वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयकाकरीता अधिष्ठता अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले विभाग प्रमुख हे प्राधिकृत अधिकारी राहतील. जिल्ह्यातील इतर विभागाच्या वैद्यकीय परिपूर्तीसाठी प्रमाणपत्र देण्याचे अधिकार जिल्हा शल्यचिकीत्सक यांना पूर्वीप्रमाणे राहील.

२९. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष व निधी उपलब्ध करून द्यावा.

३०. सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्यामध्ये आपसी सामंजस्य करारनामा झाल्यानंतर सुरक्षा, स्वच्छता, वस्त्र धुलाई, आहार व सुविधा वैद्यकीय महाविद्यालय मार्फत सुरु करण्यात यावेत. सध्या रुग्णालयात उपलब्ध असलेल्या अवैद्यकीय सेवा चालू ठेवण्याबाबत अधिष्ठाता निर्णय घेतील. सदरच्या सेवा पुढे चालू ठेवायच्या झाल्यास हस्तांतरणाच्या दिनांकापर्यंतची देयके सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणेमार्फत अदा करण्यात येतील.

३१. हस्तांतरणाच्या दिवशी जिल्हा रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेल्या औषधांचा साठा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे हस्तांतरित करण्यात येईल. रुग्णालय हस्तांतरित झाल्यानंतर रुग्णालयातील औषधी व कंज्युमेबल उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही वैद्यकीय शिक्षण औषधी व द्रव्ये विभागाची राहील.

३२. या सांमजस्य कराराचा कालावधी दोन वर्ष इतका राहील

वरील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत.

जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, धाराशिव

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

संचालक,
आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई

Before Me

NOTARY
GOVT.OF INDIA
Adv.SURESH U.MULE
Dist.Osmanabad(Maha.)
Cell No.9881089078

1 DEC 2023

महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद

GOVERNMENT MEDICAL COLLEGE, OSMANABAD

New Building, Civil Hospital Compound, Osmanabad. (Maharashtra) ४१३ ५०१

e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमउ/ / 3317-25/२०२३ दि.: ०२/०५/२०२३

प्रति,

मा.आयुक्त

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,

मुंबई.

विषय :- सामजंस्य करारानूसार मनुष्यबळ उपलब्ध करून देण्या बाबत ---

संदर्भ :- १) डॉ. आर.व्हि.गलांडे पाटील जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय,उस्मानाबाद यांचे पत्र जा.क्र.जिरुउ/रुग्णालय,पाठपुरवा/४६७०-७६/२३ दिनांक २७/०२/२०२३

२) डॉ. स्मिता ए.सरोदे वैद्यकिय अधिक्षक वर्ग १ स्त्री रुग्णालय धाराशिव यांचे पत्र जा.क्र जिरुउ/नविन आ.संस्थ.का ९२६-३० दिनांक २५/०३/२०२३

३) मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद यांचे परिपत्रक जा.क्र.जिरुउ/नविन आ.संस्था का.७९३६-४६/२३ दिनांक २३/०३/२०२३

४) No: DMER-१२०११/१३/२०२२-EDU (MOU) दिनांक २७/०५/२०२२

५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शावैमउ २९४४-५२ दिनांक ०६/०४/२०२३

६) वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे समायोजन करणे बाबतचे या कार्यालयास प्राप्त झालेले पत्र आ.क्र४६९९ दिनांक १८/०४/२०२३

७) महाराष्ट्र राज्य गव्हर्न्मेन्ट नर्सेस असोसिएशन, उस्मानाबाद यांचे या कार्यालयास प्राप्त झालेले पत्र आ.क्र ४८६९ दिनांक ०२/०५/२०२३

मा. महोदय,

उपरोक्त विषया नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील सद्यपरिस्थीती आपल्या अवलोकनार्थ व योग्य त्या आदेशीत कार्यवाहीसाठी निवेदित करीत आहे.

जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालय धाराशिव (उस्मानाबाद) हे संदर्भीय पत्र क्र.४ नुसार सामजंस्य करारानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव (उस्मानाबाद) यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

जिल्हा शल्यचिकित्सकांच्या संदर्भ क्र.१ मधील पत्रानुसार सामजंस्य करारावा आधार घेवून वर्ग -१ ते वर्ग-४ संवर्गातील सर्व मनुष्यबळ दिनांक १५ जून २०२३ नंतर सार्वजनिक आरोग्य विभागातील इतर रुग्णालयाकडे वर्ग केले जाणार आहे.

नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करावयास लागणारे संलग्नीत रुग्णालय उपलब्ध करून घेण्यासाठी सामजंस्य करार करण्यात आला होता. संदर्भ क्र. ४ नुसार सदरील करारावा कालावधी हा तीन वर्षाइतका आहे असे सामजंस्य करारामधील मुद्दा क्र. ३२ मध्ये नमूद केले आहे, मात्र त्याच बरोबर सामजंस्य करारातील मुद्दा क्र. ०५ मध्ये असे नमूद आहे, की आरोग्य सेवेतील तज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी फक्त एक वर्षासाठी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत राहतील.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव (उस्मानाबाद) येथे झालेल्या राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या फेब्रूवारी २०२३ मधील इन्सपेक्शनमध्ये त्रूटी काढल्या आहेत. अशा परिस्थितीत रुग्णालयातील त्रुटीत वाढ झाल्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे भविष्य धोक्यात येईल.

त्याशिवाय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला उपलब्ध कर्मचारी वृंद हा खूप कमी आहे, व बहुतांश अध्यापक वर्ग Deputaton वर आहे, त्याचबरोबर रुग्णालयातील कर्मचारी अजून पूर्णपणे उपलब्ध झालेले नाहीत. अशा परिस्थितीत जर आरोग्य सेवेतील कर्मचारी जूनमध्ये संपूर्णपणे काढून घेतले तर संपुर्ण यंत्रणा विस्कळीत होऊ शकते. याचा विपरीत परिणाम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रतिमेवर तर होईलच व रुग्णसेवेवर अत्यंत विपरीत परिणाम होऊ शकतो

03/05/2023

02/05/23

(डॉ.दिलीप गोंदावी शाखा)

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तरी सदरील सर्व बाबींचा सारासार विचार करता रुग्णसेवेसाठी पुढील नियोजनाचे आदेश व्हावेत.

सामंजस्य करार हा तीन वर्षांकरीता केलेला असला तरी त्यातील मुद्दा क्र. ०५ मध्ये मनुष्यबळ केवळ एक वर्षासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव येथे देण्यात आले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रुग्णालयासाठीची पदनिर्मिती शासन स्तरावर प्रलंबित आहे.जर करारातील कलमानुसार एक वर्षानंतर जिल्हा रुग्णालयातील वर्गनिहाय वृंद सार्वजनिक आरोग्य विभागातील इतर रुग्णालयात माघारण्यात आली तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेकडे पुरेशे मनुष्यबळ आजमितीला उपलब्ध नसल्याने कठिण परिस्थीती निर्माण होऊ शकते.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे पूर्ण मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यंत जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वृंद रुग्णहितासाठी व कोव्हिड परिस्थीती लक्षात घेता, सामंजस्य करारानुसार महाविद्यालयाकडे वर्ग राहावा असे वाटते (MOU मधील मुद्दा क्र. ०५ व ३२ मध्ये योग्य बदल करून)

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे मनुष्यबळ जसे जसे प्राप्त होईल तसे तसे जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वर्ग क्रमाक्रमाने बदलावा जेणे करून रुग्णसेवेवर परिणाम होणार नाही आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची पायाभूत बांधणीही योग्य त्या दृष्टीने होईल असे वाटते.

संदर्भ क्र. ५ नुसार जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद व सी रुग्णालय उस्मानाबाद येथील कार्यरत वर्ग ४ कर्मचारी हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे समायोजन होण्यास इच्छुक आहेत, तसेच संदर्भ क्र. ६ नुसार अधिसेविका यांच्या मार्फत पत्राद्वारे जिल्हा रुग्णालयाकडील नर्सिंग स्टाफ देखील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उस्मानाबाद येथे समायोजन करून घेण्यास इच्छुक असलेबाबत कळविण्यात आले आहे. सदरील विनंती ही सामंजस्य करारास धरून नाही.सामंजस्य करारातील मुद्दा क्र. १८ मध्ये, पदे भरे पर्यंत वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाकडे कार्यरत राहील असे नमूद केले आहे,याचा अर्थबोध होत नाही.

मात्र अशी परिस्थीती आहे की, १५जून २०२३ नंतर जर सार्वजनिक आरोग्य विभागाचे मनुष्यबळ काढण्यात आले व तो पर्यंत पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध झाले नाही तर रुग्णसेवेसाठी गंभीर व विचीत्र परिस्थीती निर्माण होऊ शकते.

तरी रुग्णसेवेच्या दृष्टीकोनातून वरील सर्वबींचा सारासार विचार होऊन त्यासाठीच्या योग्य कार्यवाहीचे लवकरात लवकर निर्देश प्राप्त व्हावेत ही विनंती.

आपली विश्वासु

डॉ. शिल्पा व. दोमकुंडवार
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उस्मानाबाद

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (dbranchdmer@gmail.com) (fbranchdmer@gmail.com
२. मा. सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई. (valseva2.medd-mh@gov.in)
३. मा. संचालक आरोग्य सेवा, आयुक्तालय मुंबई-१ (dhs_२००५@rediffmail.com)
४. मा. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे-२ (shwbcell@gmail.com)
५. मा. उपसंचालक,आरोग्य सेवा लातूर (ddhslatur२००८@yahoo.com)
६. मा. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद (cs.osmanabad१@gmail.com)
७. मा. जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद (cs_osmanabad१@rediffmail.com)
८. मा. वैद्यकीय अधिक्षक सी रुग्णालय धाराशिव उस्मानाबाद (whosmanabad@rediffmail.com)

Email – 15-06-2023

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्र:- एमईडी-२०१९/प्र.क्र.१८४(भाग अ)/१९/शिक्षण-१

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गोकुलदास तेजपाल रुग्णालय आवार,
९ वा मजला, गो. ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग,नवीन मंत्रालय,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- १३.०६.२०२३.

G. M. C., Osmanabad
Inward No. 5671
Date 15-06-2023

प्रति,

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण,
मुंबई.

विषय:- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय आणि क्षय रुग्णालय येथील अधिकारी व कर्मचारी यांची पदे पुढील २ वर्षाकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई, क्र.एमईडी२०१९/प्र.क्र.१८४/१९/शिक्षण-१, दि.२७.०१.२०२१.
२) समक्रमांकित शासन पत्र दि. १७.०५.२०२३
३) आपले पत्र क्र.DMER-१२०११/१३/२०२२- EDU/१०६९/४.५.२०२३

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील उस्मानाबाद येथील २३६ खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय, ६० खाटांचे स्त्री रुग्णालय आणि २० खाटांचे क्षय रुग्णालय असे मिळून एकूण ३१६ खाटांची रुग्णालये स्थावर व जंगम मालमत्तेसह वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास नि:शुल्क वापरास उपलब्ध करुन देण्याकरिता संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई व संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्यामध्ये करावयाच्या सामंजस्य करारास संदर्भ क्र.२ येथील शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली होती.

२. संदर्भ क्र.३ येथील आपल्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर सामंजस्य करारातील अट क्र.५ व २२ मध्ये अंशत: बदल करून सदर अधिकारी व कर्मचारी यांची पदे मुदत संपुष्टात आलेल्या दिनांकापासून पुढील २ वर्षाकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने सहमती दर्शविली आहे.

३. त्यानुसार सदर मुदतवाढीस शासनाची मान्यता देण्यात येत असून यापूर्वी केलेल्या सामंजस्य करारामध्ये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अट क्र.५ व २२ मध्ये अंशत: बदल करावा. सदर कराराची प्रत शासनास सादर करावी.

आपला,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

MOU Signed

प्रत माहितीस्तव-

१) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

DMER-12011/13/2022-EDU.

Email !- 30.06.2023

/73497/2023 MOU

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

वैद्यकीय शिक्षण महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०००१

दूरध्वनी - ०२२-२२६२६२६२, संकेतस्थळ: http://www.med-edu.in & http://www.dmer.org

File No: DMER-12011/13/2022-EDU. दिनांक: /०६/२०२३

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
उस्मानाबाद.

G. M. C., Osmanabad
Inward No. 5943
Date 01-07-2023

विषय : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय आणि क्षय रुग्णालय येथील अधिकारी व कर्मचारी यांची पदे पुढील २ वर्षांकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ : शासन पत्र क्र. एमईडी-२०१९/प्र.क्र.१८४(भाग अ)/१९/शिक्षण-१, दि. १३/०६/२०२३

उपरोक्त विषयी संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नीत ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय सुरु करण्यास दिनांक २१/०१/२०२१ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान केली आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यास सुरुवात झाली आहे. सदर महाविद्यालयाचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही. परंतु राष्ट्रिय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त उस्मानाबाद येथील २३६ खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय, ६० खाटांचे स्त्री रुग्णालय आणि २० खाटांचे क्षयरोग रुग्णालय स्थावर जंगम मालमत्तेसह वैद्यकीय शिक्षण विभागाकडे तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई आणि संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेमध्ये दिनांक १८/०५/२०२२ अन्वये तीन वर्षांच्या कालावधीसाठी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारातील अट क्र. ५ व २२ मध्ये नमुद केल्यानुसार जिल्हा रुग्णालयाकडील अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांची मुदत संपुष्टात आलेली आहे.

यास्तव दिनांक १३/०६/२०२३ च्या शासन पत्रात नमुद केल्यानुसार सामंजस्य करारातील अट क्र. ५ व २२ मध्ये अंशत: बदल करुन सदर अधिकारी व कर्मचारी यांची पदे मुदत संपुष्टात आलेल्या दिनांकापासून पुढील २ वर्षांकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने सहमती दर्शविली आहे. त्यानुसार अट क्र. ५ व २२ मध्ये अंशत: बदल करण्यास मंजूरी प्रदान केली आहे. **सोबत शासन पत्राची प्रत जोडली आहे.**

सबब उक्त शासन पत्रात नमुद केल्यानुसार सामंजस्य करारातील अट क्र. ५ व २२ मध्ये अंशत: बदल करुन सामंजस्य कराराचा सुधारित मसुदा तयार करुन स्वाक्षरीकरीता सादर करण्यात यावा. जेणे करुन पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

Signed by Deelip Govindrao Mhaisekar
Date: 30-06-2023 11:13:39

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

प्रत: मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,मुंबई -१.

मा. विधिमंत्री
वैद्यकीय शिक्षण
PA

1) All Proposal 2)-G-New College & Hospital Unmasked Revised final Proposal as per NMC Norms सुधारित एमओयु सादर करणेबाबत 3)शिक्षण खाना दालनामे पत्र 30-06-2023.docx

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, OSMANABAD
New Building, Civil Hospital Compound, Osmanabad. (Maharashtra) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमउ/ / 3317-25 /२०२३ दि.: ०२/०५/२०२३

प्रति,

मा.आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

विषय :- सामजंस्य करारानूसार मनुष्यबळ उपलब्ध करून देण्या बाबत ---

संदर्भ :- १) डॉ. आर.व्हि.गलांडे पाटील जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय,उस्मानाबाद यांचे पत्र जा.क्र.जिरुउ/रुग्णालय,पाठपुरवा/४६७०-७६/२३ दिनांक २७/०२/२०२३

२) डॉ. स्मिता ए.सरोदे वैद्यकिय अधिक्षक वर्ग १ स्त्री रुग्णालय धाराशिव यांचे पत्र जा.क्र जिरुउ/नविन आ.संस्थ.का ९२६-३० दिनांक २५/०३/२०२३

३) मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद यांचे परिपत्रक जा.क्र.जिरुउ/नविन आ.संस्था का.७९३६-४६/२३ दिनांक २३/०३/२०२३

४) No: DMER-१२०११/१३/२०२२-EDU (MOU) दिनांक २७/०५/२०२२

५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शावैमउ २९४४-५२ दिनांक ०६/०४/२०२३

६) वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे समायोजन करणे बाबतचे या कार्यालयास प्राप्त झालेले पत्र आ.क्र४६१९ दिनांक १८/०४/२०२३

७) महाराष्ट्र राज्य गव्हर्न्मेन्ट नर्सेस असोसिएशन, उस्मानाबाद यांचे या कार्यालयास प्राप्त झालेले पत्र आ.क्र ४८६१ दिनांक ०२/०५/२०२३

मा. महोदय,

उपरोक्त विषया नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील सद्यपरिस्थीती आपल्या अवलोकनार्थ व योग्य त्या आदेशीत कार्यवाहीसाठी निवेदित करीत आहे.

जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालय धाराशिव (उस्मानाबाद) हे संदर्भीय पत्र क्र.४ नुसार सामजंस्य करारानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव (उस्मानाबाद) यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

जिल्हा शल्यचिकित्सकांच्या संदर्भ क्र.१ मधील पत्रानुसार सामजंस्य कराराचा आधार घेवून वर्ग -१ ते वर्ग-४ संवर्गातील सर्व मनुष्यबळ दिनांक १५ जून २०२३ नंतर सार्वजनिक आरोग्य विभागातील इतर रुग्णालयाकडे वर्ग केले जाणार आहे.

नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करावयास लागणारे संलग्नीत रुग्णालय उपलब्ध करून घेण्यासाठी सामजंस्य करार करण्यात आला होता. संदर्भ क्र. ४ नुसार सदरील कराराचा कालावधी हा तीन वर्षाइतका आहे असे सामजंस्य करारामधील मुद्दा क्र. ३२ मध्ये नमूद केले आहे, मात्र त्याच बरोबर सामजंस्य करारातील मुद्दा क्र. ०५ मध्ये असे नमूद आहे, की आरोग्य सेवेतील तज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी फक्त एक वर्षासाठी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत राहतील.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव (उस्मानाबाद) येथे झालेल्या राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या फेब्रूवारी २०२३ मधील इन्सपेक्शनमध्ये त्रूटी काढल्या आहेत. अशा परिस्थितीत रुग्णालयातील त्रुटीत वाढ झाल्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे भविष्य धोक्यात येईल.

त्याशिवाय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला उपलब्ध कर्मचारी वृंद हा खूप कमी आहे, व बहुतांश अध्यापक वर्ग Deputaton वर आहे, त्याचबरोबर रुग्णालयातील कर्मचारी अजून पूर्णपणे उपलब्ध झालेले नाहीत. अशा परिस्थितीत जर आरोग्य सेवेतील कर्मचारी जूनमध्ये संपूर्णपणे काढून घेतले तर संपुर्ण यंत्रणा विस्कळीत होऊ शकते. याचा विपरीत परिणाम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रतिमेवर तर होईलच व रुग्णसेवेवर अत्यंत विपरीत परिणाम होऊ शकतो

03/05/2023

०२/०५/२३

लिपिक, नोंदणी शाखा
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तरी सदरील सर्व बाबींचा सारासार विचार करता रुग्णसेवेसाठी पुढील नियोजनाचे आदेश व्हावेत.

सामंजस्य करार हा तीन वर्षांकरीता केलेला असला तरी त्यातील मुद्दा क्र ०५ मध्ये मनुष्यबळ केवळ एक वर्षासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव येथे देण्यात आले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रुग्णालयासाठीची पदनिर्मिती शासन स्तरावर प्रलंबित आहे.जर करारातील कलमानुसार एक वर्षानंतर जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वृंद सार्वजनिक आरोग्य विभागातील इतर रुग्णालयात माघारी गेला तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेकडे पुरेशे मनुष्यबळ आस्थापनेला उपलब्ध नसल्याने कठिण परिस्थीती निर्माण होऊ शकते.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे पूर्ण मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यंत जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वृंद रुग्णहितासाठी व कोव्हिड परिस्थीती लक्षात घेता, सामंजस्य करारानुसार महाविद्यालयाकडे वर्ग रहावा असे वाटते (MOU मधील मुद्दा क्र. ०५ व ३२ मध्ये योग्य बदल करून)

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे मनुष्यबळ जसे जसे प्राप्त होईल तसे तसे जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वर्ग क्रमाक्रमाने बदलावा जेणे करून रुग्णसेवेवर परिणाम होणार नाही आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची पायाभूत बांधणीही योग्य त्या दृष्टीने होईल असे वाटते.

संदर्भ क्र. ५ नुसार जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद व स्त्री रुग्णालय उस्मानाबाद येथील कार्यरत वर्ग ४ कर्मचारी हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे समायोजन होण्यास इच्छुक आहेत, तसेच संदर्भ क्र. ६ नुसार अधिसेविका यांच्या मार्फत पत्राद्वारे जिल्हा रुग्णालयाकडील नर्सिंग स्टाफ देखील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उस्मानाबाद येथे समायोजन करून घेण्यास इच्छुक असलेबाबत कळविण्यात आले आहे. सदरील विनंती ही सामंजस्य करारास धरून नाही.सामंजस्य करारातील मुद्दा क्र. १८ मध्ये, पदे भरे पर्यंत वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाकडे कार्यरत राहील असे नमूद केले आहे,याचा अर्थबोध होत नाही.

मात्र अशी परिस्थीती आहे की, १५जून २०२३ नंतर जर सार्वजनिक आरोग्य विभागाचे मनुष्यबळ काढण्यात आले व तो पर्यंत पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध झाले नाही तर रुग्णसेवेसाठी गंभीर व विचीत्र परिस्थीती निर्माण होऊ शकते.

तरी रुग्णसेवेच्या दृष्टीकोनातून वरील सर्वांचा सारासार विचार होऊन त्यासाठीच्या योग्य कार्यवाहीचे लवकरात लवकर निर्देश प्राप्त व्हावेत ही विनंती.

आपली विश्वासु

डॉ. शिल्पा व. दोमकुंडवार
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उस्मानाबाद

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (dbranchdmer@gmail.com) (fbranchdmer@gmail.com
२. मा. सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई. (valseva2.medd-mh@gov.in)
३. मा. संचालक आरोग्य सेवा, आयुक्तालय मुंबई-१ (dhs_2004@rediffmail.com)
४. मा. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे-२ (sfwboal@gmail.com)
५. मा. उपसंचालक,आरोग्य सेवा लातूर (ddhslatur2007@yahoo.com)
६. मा. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद (cs.osmanabad1@gmail.com)
७. मा. जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद (cs_osmanabad1@rediffmail.com)
८. मा. वैद्यकीय अधिक्षक स्त्री रुग्णालय धाराशिव उस्मानाबाद (whosmanabad@rediffmail.com)

Email - 15-06-2023

तात्काळ

G. M. C., Osmanabad
Inward No. 5671
Date 15-06-2023

महाराष्ट्र शासन
क्र:- एमईडी-२०१९/प्र.क्र.१८४(भाग अ)/१९/शिक्षण-१
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गोकुलदास तेजपाल रूग्णालय आवार,
९ वा मजला, गो. ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग,नवीन मंत्रालय,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- १३.०६.२०२३.

प्रति,

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण,
मुंबई.

विषय:- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय आणि क्षय रुग्णालय येथील अधिकारी व कर्मचारी यांची पदे पुढील २ वर्षाकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई, क्र.एमईडी२०१९/प्र.क्र.१८४/१९/शिक्षण-१, दि.२७.०१.२०२१.
२) समक्रमांकित शासन पत्र दि. १७.०५.२०२३
३) आपले पत्र क्र.DMER-१२०११/१३/२०२२- EDU./१०६९/४.५.२०२३

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील उस्मानाबाद येथील २३६ खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय, ६० खाटांचे स्त्री रुग्णालय आणि २० खाटांचे क्षय रुग्णालय असे मिळून एकूण ३१६ खाटांची रुग्णालये स्थावर व जंगम मालमत्तेसह वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास नि:शुल्क वापरास उपलब्ध करुन देण्याकरिता संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई व संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्यामध्ये करावयाच्या सामंजस्य करारास संदर्भ क्र.२ येथील शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली होती.

२. संदर्भ क्र.३ येथील आपल्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर सामंजस्य करारातील अट क्र.५ व २२ मध्ये अंशत: बदल करून सदर अधिकारी व कर्मचारी यांची पदे मुदत संपुष्टात आलेल्या दिनांकापासून पुढील २ वर्षाकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने सहमती दर्शविली आहे.

३. त्यानुसार सदर मुदतवाढीस शासनाची मान्यता देण्यात येत असून यापुर्वी केलेल्या सामंजस्य करारामध्ये उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अट क्र.५ व २२ मध्ये अंशत: बदल करावा. सदर कराराची प्रत शासनास सादर करावी.

आपला,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

MOU Electronic mind

प्रत कार्यालयीन हस्तक-
१) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

DMER-12011/13/2022-EDU.

Email :- 30.06.2023

/73497/2023 MOU

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

http://www.med-edu.in & http://www.dmer.org

File No: DMER-12011/13/2022-EDU. दिनांक: /०६/२०२३

G. M. C., Osmanabad
Inward No. 5943
Date 01-07-2023

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
उस्मानाबाद.

विषय : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय आणि क्षय रुग्णालय येथील अधिकारी व कर्मचारी यांची पदे पुढील २ वर्षांकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ : शासन पत्र क्र. एमईडी-२०१९/प्र.क्र.१८४(भाग अ)/१९/शिक्षण-१, दि. १३/०६/२०२३

उपरोक्त विषयी संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नीत ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय सुरु करण्यास दिनांक २१/०१/२०२१ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी प्रदान केली आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यास सुरुवात झाली आहे. सदर महाविद्यालयाचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही. परंतु राष्ट्रिय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त उस्मानाबाद येथील २३६ खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय, ६० खाटांचे स्त्री रुग्णालय आणि २० खाटांचे क्षयरोग रुग्णालय स्थावर जंगम मालमत्तेसह वैद्यकीय शिक्षण विभागाकडे तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई आणि संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेमध्ये दिनांक १८/०५/२०२२ अन्वये तीन वर्षांच्या कालावधीसाठी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारातील अट क्र. ५ व २२ मध्ये नमुद केल्यानुसार जिल्हा रुग्णालयाकडील अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांची मुदत संपुष्टात आलेली आहे.

यास्तव दिनांक १३/०६/२०२३ च्या शासन पत्रात नमुद केल्यानुसार सामंजस्य करारातील अट क्र. ५ व २२ मध्ये अंशत: बदल करुन सदर अधिकारी व कर्मचारी यांची पदे मुदत संपुष्टात आलेल्या दिनांकापासून पुढील २ वर्षांकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद येथे कार्यरत ठेवण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने सहमती दर्शविली आहे. त्यानुसार अट क्र. ५ व २२ मध्ये अंशत: बदल करण्यास मंजूरी प्रदान केली आहे. **सोबत शासन पत्राची प्रत जोडली आहे.**

सबब उक्त शासन पत्रात नमुद केल्यानुसार सामंजस्य करारातील अट क्र. ५ व २२ मध्ये अंशत: बदल करुन सामंजस्य कराराचा सुधारित मसुदा तयार करुन स्वाक्षरीकरीता सादर करण्यात यावा. जेणे करुन पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

Signed by Deelip
Govindrao Mhaisekar
Date: 30-06-2023 11:13:39

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

प्रत: मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,मुंबई -१.

मा. अधिष्ठाता
[illegible]
PA

GOVT. OF MAHARASHTRA

Public Health Department

(PRE – NATAL DIAGNOSTIC TECHNIQUES (REGULATION AND PREVENTION OF MISUSE) RULES, 1996)

SCHEDULE III

CERTIFICATE OF REGISTRATION

1. In exercise of the powers conferred under Sec. 19 (1) of the Pre- natal Diagnostic Techniques (Regulation and Prevention of Misuse) Act, 1994 (57 of 1994), the Appropriate Authority **Civil Surgeon Dist Hospital Dharashiv** hereby grants registration to the Genetic Counseling Centre/ Genetic laboratory*/ **Genetic clinic** *named below for purposes of carrying out Genetic Counseling Pre- natal Diagnostic Procedures* /Pre – natal Diagnostic Tests as defined in the aforesaid Act for a period of five years ending on **30/04/2028**

2. This registration is granted subject of the aforesaid Act and Rules there under and any contravention there of shall result in suspension of cancellation of this Certificate of Registration before the expiry of he said Period of five years.

A) Name and address of the Genetic Counseling Centre/ Genetic Laboratory/ Genetic Clinic **CIVIL HOSPITAL, DHARASHIV. TQ.- DHARASHIV, DIST. - DHARASHIV**

B) **Name of Applicant for registration Application :**

ADDITIONAL CIVIL SURGEON ,CIVIL HOSPITAL, DHARASHIV

Operater : 1.DR.SHILPA VASANTRAO DOMKUNDWAR (MBBS MD RADIO.)

2.DR. SHRIPAD BALWANDE (MBBS DMRE)

3.DR. MEGHA DILIP KALE (MBBS MD RADIO.)

C) **Pre-natal diagnostic procedures approved for (Genetic Clinic)**

i) Ultrasound ~~ii) Amniocentesis~~

~~ii) Chorionic villa biopsy~~ ~~iv) Foestoscopy~~

~~v) Fetal skin or organ biopsy~~ ~~vi) Cordocentesis~~

vii) Any other (specify) CT SCAN

D) **Pre- natal diagnostic procedures approved of (for Genetic Laboratory)**

I ~~Chromosomal Studies~~ ii ~~Biochemical studiers~~

iii ~~Molecular studies~~

3. Registration No. allotted " **21**" **1.SAMSUNG MEDISON ,MODEL & SER NO- SOQQM3HF7000347, SONOACE R7 , (MRC NO.MH/OM/0079)**

2. ZONCARE ,MODEL NO- Q7 , SR.NO.- A3294361CTS01N0002

3. CT SCAN- CANON MEDICAL 16 SLICE, MODEL- TSX-035A AQUILION LIGHTING SR.NO.- 7CC18X2280 (MRC NO.MH/OM/0198)

4. **4.SAMSUNG , MODEL NO- V8 , SR.NO.- 52Z9M3HWB00004D (MRC NO.MH/OM/0201)**

For renewed Certificate of Registration only Period of validity of earlier Certificate From **01/05/2023** To **30/04/2028** or Registration

30/05/2024
Date :

Civil Surgeon Dharashiv
Seal

Signature, Name and Designation of The Appropriate Authority

Civil Surgeon, Dharashiv

Dean, Government Medical College Dharashiv



महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CH 150274

अनु.क्र 30480 दि 23/12/2024 रु. किंमत 500/-
दस्ताचा प्रकार: Agreement
दस्त नोंदणी करणार आहेत का? होय/नाही /
मिळकतीचे वर्णन /
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव Krsnaa Diagnostics Limited
पत्ता Chichwad pune-19
दुसऱ्या पक्षकाराचे नांव Co.mmo. Health services and Mission Director. National Health Mission Gov. of State of Mah.
हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता Avinash mane.
Avinash.
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही
सौ.मालती वसंत मोकाशी
परवाना क्र २२०११४६
तालेरानगर, चिंचवड, पुणे.-१९

वरिष्ठ को. अधिकारी पुणे
21 FEB 2024
प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुण करिता

MRI Scan in PPP Mode Services Agreement

This agreement (hereinafter referred to as "Agreement") is made at Mumbai on this 29th day of April 2024, between the Commissioner, Health Services and Mission Director, National Health Mission, on behalf of Governor of State of Maharashtra, Mumbai, having registered office at Aarogya Bhavan, St. George Hospital's compound, P.D. Mello Road, Mumbai 400 001, (hereinafter referred to as **"Procurer"** which expression shall unless it be repugnant to the context mean and include its administrators and permitted assigns) of the First Part;

AND

Krsnaa Diagnostics Limited, having its registered office at S. No. 243/A, Hissa No. 6, CTS No. 4519, 4519/1, near Chinchwad Station, Chinchwad, Taluka – Haveli, Pune, 411019, represented through its authorized signatory **Mr. Anil Gulabrao Salunkhe, Executive Vice President-PPP & Govt. Affairs** (hereinafter referred to as **"Service Provider"** which

(Dr. NITIN AMBADEKAR)
DIRECTOR OF HEALTH SERVICES,
MAHARASHTRA STATE,
MUMBAI

Dean,
Government Medical College
Dharashiv

KRSNAA DIAGNOSTICS LTD Chinchwad Pune-19

expression shall unless it be repugnant to the context mean and include its administrators and permitted assigns) of the Second and Final Part;

Procurer and **Service Provider** shall hereinafter be individually referred to as a **"Party or party"** and collectively as the **"Parties or parties"**, as the context may require.

Recitals:

WHEREAS:

1. The Procurer had invited Bids for **Appointment of Service Provider for Outsourcing of 1.5 Tesla MRI Services in a PPP Mode and Operational Partner for Existing CT Scan Centers** through Tender Reference No: E Tender No.-E-02/CHS/NHM/MRI Services in PPP /P.C./2023-24, dated 18.09.2023 (**"Tender"**).

